(प्रस्तुत प्रकरणात सुरूवातीला वादीकडुन कोणताही उलटतपास घेण्यात आला नव्हता परंतु त्यानंतर मा. उच्च न्यायालय यांचे रिट पिटीशन नं. ४०४/२०२५ मधील आदेशान्वये वादीला अधिकचा पुरावा नोंदविण्यास परवानगी देण्यात आली आहे. त्यानंतर वादीने त्याचा पुढील पुरावा नोंदवून प्रकरण पुन्हा प्रतिवादीच्या पुराव्यासाठी लावण्यात आले आहे. सबब न्यायाच्या हेतून वादीला प्रतिवादी क्र. १ व २ तर्फे सा.क्र. १ यांचा उलटतपास नोंदविण्यास परवानगी देण्यात येत आहे.)

**उलटतपास वादीतर्फे वकील श्री.जी.के.टिकार यांचे मार्फत शपथेवर सुरू —**

**१४.** मी जे पुराव्याचे माझे शपथपत्र दाखल केले आहे ते प्रतिवादी क्र. १ व २ तर्फे दाखल केले आहे. हे म्हणणे खरे आहे की आमचे कार्यालयाचे हे काम आहे की आम्ही शासनाच्या अटी व शर्तीनुसार कार्य करायला पाहिजे. हे म्हणणे खरे नाही की पशुचिकीत्सालयाच्या बांधकामाच्या जागेची माहिती आम्हाला पहिल्यांदा सन २०११ मध्ये माहित झाली. सन २०११ पूर्वी पशुचिकीत्सालय यांच्या कार्यालयामार्फत आमच्याकडे जागेचे कोणतेही दस्तऐवज आले नव्हते. सहायक आयुक्त लघुपशुचिकीत्सालय, दवाखाना अकोट यांना मुख्य आयुक्त मध्यप्रांत, नागपुर यांनी सन १९३२—३३ मध्ये भाडेतत्वावर १९६२—६३ पर्यंत सदर जागा देण्यात आली होती हे दर्शविणारे दस्त आम्ही या प्रकरणात दाखल केले आहे. मला या प्रकरणाचा संपूर्ण अभिलेख दाखविल्यास मी तो दस्त दाखवू शकतो. आता मला या प्रकरणाचा संपूर्ण अभिलेख दाखविण्यात आला. सदर दस्त आम्ही निशाणी २१ या कागदपत्राच्या यादीसोबत अ.क्र. ९ ला दाखल केला आहे. तो दस्त म्हणजे टाउनसेटलमेंट ऑफीसर इलीचपूर कॅम्प यांच्या आदेशाची प्रत होय.

**१५.** पशुचिकीत्सालय यांच्या कार्यालयाने आम्हाला बांधकाम करण्यापूर्वी ताबा पावती लिहुन दिली आहे. ती आम्ही या प्रकरणात दाखल केली आहे. मला या प्रकरणाचा संपूर्ण अभिलेख दाखविल्यास मी ती ताबा पावती दाखवू शकतो. आता मला या प्रकरणाचा संपूर्ण अभिलेख दाखविण्यात आला. सदर ताबा पावती आम्ही निशाणी २१ या कागदपत्राच्या यादीसोबत अ.क्र. ९ ला असलेल्या दस्तासोबत जोडलेली आहे. मी या प्रकरणात दिनांक १४.०८.२०१२ रोजीचा प्रशासकिय मान्यता व निधी वितरणाबाबत जिल्हाधिकारी यांनी दिलेल्या पत्राचा दस्त निशाणी २१ या कागदपत्राच्या यादीसोबत अ.क्र. ३ ला दाखल केला आहे. (दोन्ही पक्षांच्या विधीज्ञांनी सदर दस्तास निशाणी देण्याची विनंती केली. सबब प्रशासकीय कारणास्तव त्यास **निशाणी १४५** देण्यात येते.) त्यातील अ.क्र. १२ ची अट बरोबर आहे. हे म्हणणे खरे नाही की सदर जागेबाबत वाद असल्याची आम्हाला माहिती होती.

**१६.** आता मला निशाणी २१ सोबत आम्ही अ.क्र. ४ ला दाखल केलेले उपमुख्य वास्तु शास्त्रज्ञ यांनी आम्हाला पाठविलेले दिनांक १०.०६.२०१३ रोजीचे पत्र दाखविण्यात आले. हे म्हणणे खरे आहे की सदर पत्रात असे नमुद आहे की प्रत्यक्ष बांधकामास सुरूवात करण्यापूर्वी इमारतीच्या आराखडयास व वस्तुमांडणी आराखडयास स्थानीक प्राधीकरणाची मान्यता/नाहरकत प्रमाणपत्र प्राप्त करण्यात यावी. सदर पत्राच्या प्रतीस **निशाणी १४६** देण्यात येते. सदर पत्रात नमुद असल्याप्रमाणे आम्ही नाहरकत प्रमाणपत्र प्राप्त केले आहे. हे म्हणणे खरे आहे की ''सदरील कामास प्रतिवादी क्र. १ व २ यांनी दिनांक २१.१२.२०११ पासुन सुरूवात केली'' हा माझ्या पुराव्याच्या शपथपत्रातील परीच्छेद क्रमांक ४ मध्ये शेवटच्या दोन ओळीतील मजकुर बरोबर आहे. हे म्हणणे खरे नाही की आम्ही स्थानीक प्राधीकरणाची परवानगी न घेता सन २०११ मध्ये बांधकाम सुरू केले.

**१७.** आता मला निशाणी ११६ हा दिनांक २४.०५.२०१३ रोजीचा कार्यारंभ आदेश दाखविण्यात आला. हे म्हणणे खरे नाही की सदर कार्यारंभ आदेशापूर्वी आम्ही वादातील जागेवर बांधकाम सुरू केले होते. हे म्हणणे खरे नाही की मे. चांडक कंन्सट्रक्शन यांनी आमच्याविरूध्द दिवाणी दावा दाखल केला होता. हे मला माहित नाही की सदर दावा याच न्यायालयात मंजूर झाला आहे.

**१८.** आता मला निशाणी २१ सोबत अ.क्र. ७ ला आम्ही दाखल केलेले दिनांक १२.०८.२०१३ रोजीच्या मुख्याधिकारी नगर परीषद यांना पाठविण्यात आलेल्या पत्राची प्रत दाखविण्यात आली. (दोन्ही पक्षांच्या विधीज्ञांनी सदर दस्तास निशाणी देण्याची विनंती केली. सबब प्रशासकीय कारणास्तव त्यास **निशाणी १४७** देण्यात येते.) साक्षीदार स्वत:हुन सांगतो की त्यापूर्वी सुध्दा आम्ही त्यांच्याकडे परवानगी मागितली आहे.

**१९.** आता मला निशाणी २१ सोबत अ.क्र. ८ ला आम्ही दाखल केलेले दिनांक १२.०८.२०१३ रोजीच्या सहायक आयुक्त तालुका लघुपशु सर्वचिकित्सालय, अकोट यांना पाठविण्यात आलेल्या पत्राची प्रत दाखविण्यात आली.(दोन्ही पक्षांच्या विधीज्ञांनी सदर दस्तास निशाणी देण्याची विनंती केली. सबब प्रशासकीय कारणास्तव त्यास **निशाणी १४८** देण्यात येते.) हे म्हणणे खरे नाही की आम्ही कार्यारंभ आदेश केला त्यावेळी आमच्याकडे नगर परीषद यांची परवानगी मिळाली नव्हती व पशुचिकीत्सालय यांचेकडुन जागेचा ताबा मिळाला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की त्यामुळेच आम्ही निशाणी १४७ व १४८ हे पत्र दिले आहेत.

**२०.** आता मला निशाणी २१ सोबत आम्ही अ.क्र. १० ला दाखल केलेल्या जिल्हाधिकारी, अकोला (नझुल विभाग) यांना उपविभागीय अधिकारी, अकोट यांनी पाठविलेल्या दिनांक ०२.०१.२०१२ रोजीच्या पत्राची प्रत दाखविण्यात आली. त्यातील मजकुर बरोबर आहे. (दोन्ही पक्षांच्या विधीज्ञांनी सदर दस्तास निशाणी देण्याची विनंती केली. सबब प्रशासकीय कारणास्तव त्यास **निशाणी १४९** देण्यात येते.)

**२१.** आता मला निशाणी २१ सोबत आम्ही अ.क्र. १० सोबत दाखल केलेल्या जिल्हाधिकारी, अकोला (नझुल विभाग) यांना उपविभागीय अधिकारी, अकोट यांनी पाठविलेल्या दिनांक १०.१२.२०१३ रोजीच्या पत्राची प्रत दाखविण्यात आली. त्यातील मजकुर बरोबर आहे. (दोन्ही पक्षांच्या विधीज्ञांनी सदर दस्तास निशाणी देण्याची विनंती केली. सबब प्रशासकीय कारणास्तव त्यास **निशाणी १५०** देण्यात येते.) हे म्हणणे खरे नाही की निशाणी १४९ व १५० अन्वये ही बाब दिसुन येते की दिनांक १०.१२.२०१३ रोजीपर्यंत वादातील जागा पशुचिकीत्सालय यांच्या नावे झाली नव्हती याची मला माहिती होती.

**२२.** आता मला निशाणी २१ सोबत अ.क्र. १४ ला दाखल असलेला निशाणी ११७ हा दिनांक २५.०५.२००४ रोजीचा शासन निर्णय दाखविण्यात आला. हे म्हणणे खरे नाही की सदर निशाणी ११७ मधील परीच्छेद क्रमांक ५ वरून हे स्पष्ट होते की सन २००४ पर्यंत वादीतील जागा ही पशुचिकीत्सालय यांच्या ताब्यात नव्हती. हे म्हणणे खरे नाही की सदर वादातील जागा ही डिस्ट्रीक्ट काउंसील म्हणजेच जिल्हा परीषदेच्या ताब्यात होती.

**२३.** मी निशाणी ११२ या माझ्या पुराव्याच्या शपथपत्रातील परीच्छेद क्रमांक ३ मध्ये नमुद केलेला धनादेश मी या प्रकरणात दाखल केलेला नाही कारण प्रशासकिय मान्यतेनंतर निधी अलॉट करण्यात आला होता. हे म्हणणे खरे नाही की आम्हाला इमारतीच्या बांधकामाकरीता जिल्हाधिकारी यांचेकडुन कोणतीही मान्यता मिळाली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की इमारतीचे बांधकामाचे काम हे मे. चांडक कंन्सट्रक्शन यांना देण्यात आले होते. हे म्हणणे खरे नाही की आम्ही सदर चांडक कंन्सट्रक्शन यांनी केलेल्या कामाचे पैसे त्यांना दिले नाही म्हणुन त्यांनी आमचेविरूध्द दावा दाखल केला होता. हे मला माहित नाही की त्या दाव्याचा क्रमांक हा १/२०२२ असा आहे. हे म्हणणे खरे नाही की दिनांक २१.१२. २०११ रोजी आम्ही ज्यावेळी काम सुरू केले त्यावेळी आमचेकडे कार्यारंभ आदेश व बांधकाम परवानगी नव्हती. आम्ही दिनांक २१.१२.२०११ रोजीच्या जिल्हाधिकारी यांच्या प्रशासकिय मान्यतेचे पत्र या प्रकरणात दाखल केले आहे.

**२४.** हे म्हणणे खरे नाही की आम्ही वादातील जागेवर बांधकामाबाबत ज्यावेळी पत्र व्यवहार केला त्यावेळी सदर जागेवर वादीचा आर्युवेदीक दवाखाना होता. हे म्हणणे खरे नाही की सदर जागा वादीला जिल्हा परीषद यांनी दिनांक १९.१२.२००१ रोजीच्या ठरावाने भाडेतत्वावर दिली होती. हे म्हणणे खरे नाही की वादीचा त्या ठिकाणी ताबा होता म्हणुन आम्हाला त्या ठिकाणी बांधकाम करता आले नाही. हे म्हणणे खरे नाही की न्यायालयाने मनाई हुकूम दिल्यामुळे वादातील जागेवरील आमचे बांधकाम बंद पडले होते. हे म्हणणे खरे नाही की आमचे बांधकाम पूर्ण झाले नाही म्हणुन चांडक कंन्सट्रक्शन यांनी आमचे विरूध्द नुकसान भरपाईचा दावा दाखल केला होता. हे म्हणणे खरे आहे की या प्रकरणातील निशाणी ५ वरील आदेशाविरूध्द दाखल केलेले अपिल नामंजूर झाले आहे. हे म्हणणे खरे नाही की त्यामुळे आम्ही वादातील जागा कधीही ताब्यात घेतली नाही व त्यावर कोणतेही बांधकाम केले नाही. हे म्हणणे खरे नाही की आम्ही वादीविरूध्द खोटी फिर्याद देवून खोटा गुन्हा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की मी पुराव्याचे खोटे शपथपत्र दाखल करून खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

माझे समक्ष/श्रवणोत्तर स्विकृत,

स्वा/—

दि. ३०.०६.२०२५.

( महेश एस. काळे )

**दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, अकोट**